# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/12/2021 (सोमवार)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 02/07/2019 चे 15.15 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. 507/2019 कलम 354 (ड) भादवी सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 01/07/2019 चे 16.00 वा. दरम्यान 16 वर्षीय पिडीत/फिर्यादी मुलगी हिला आरोपी नामे – अतुल उर्फ अमोल श्रावण कळंबे, वय 24 वर्ष, रा. मोहगाव हवेली ता. सौंसर जि छिंदवाडा(मध्यप्रदेश) याने तिला माझे मोटरसायकलवर बस फिरायला जाउ, असे म्हणुन एक वर्षा पासुन तिचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 13/08/2019 चे 17.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला सहायक पोलीस निरीक्षक सोनाली रासकर, पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 06/12/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. जैस्वाल, सेशन कोर्ट, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.


सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. शेख यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशारकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. प्रमोद कडबे, श्री. शंकर तराळे, पोहवा श्री. मनोज तिवारी, श्री. सुनिल डोंगरे यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. बोरी :– दिनांक 05/12/2021 चे 04.00 वा. ते 05.00 वा. दरम्यान बोरी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बोरी पोलीस पथकाने तात्काळ वाय पाईंट बोरी येथे जावून नाकाबंदी केली असता एम. एच.–40/ सीबी –2202 क्रमांकाच्या ट्रक येतांना दिसला. ट्रकला थांबविण्याचा इशारा केला असता सदर वाहनाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक तेथे न थांबविता बोरखेडी शिवाराकडे निघून गेला. बोरी पोलीस पथकाने ट्रक चा पाठलाग करून बोरखेडी शिवार येथे ट्रकला थांबवून ट्रकची झडती घेतली असता सदर ट्रकमध्ये आरोपी नामे– 1. शेख मोसीन मोबीन कुरेशी वय 24 वर्ष रा टेकानाका नागपुर, 2. मो.रफीक खान अब्दुल रशीद खान उर्फ सदाम शेख, वय 30 वर्ष, रा. भाजीमंडी कामठी व 3. फिरोज रा. कामठी भाजीमंडी जि. नागपुर यांच्या ताब्यातुन 24(बैल) जनावरे कि. 2,40,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. त्यापैकी 1 गोरा मृत अवस्थेत आढळुन आला. वाहनासह एकुण किंमती 7,40,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे मपोउपनी आरती उघडे, पो.स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(जी)(1)(डि)(1)(सी) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 179,184,66(1),192(ए) मोवाका सहकलम 119 महाराष्ट्र पोलीस अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ सुरेश धवराळ मो नं 9765497005 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बोरी चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात मपोउपनी आरती उघडे, सफौ सुरेश धवराळ, पोलीस शिपाई ओम राठोड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



2) पो.स्टे. मौदाः– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील रबडीवाला पाईंट येथे दिनांक 05/12/2021 चे 10.40 वा. ते 11.20 वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन सी. जी.–07/ बीएल –7606 क्रमांकाच्या आयसर सहा चाकी ट्रकला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– उमेश चेतराम देवडा, वय 32 वर्ष, रा. यशोधरा नगर, नागपुर याच्या ताब्यातुन 26(गोवंश) जनावरे किंमती 2,60,000/– रु. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण किंमती 8,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई शिवाजी नागरे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(डि)प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9(अ) महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक मनिराम भुरे मा. क. 9284122905 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे यांचे नेतृत्वात पोलीस नाईक मनिराम भुरे, पोलीस शिपाई शिवाजी नागरे, जितेन्द्र बोरकर, केशव फड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



## चोरी

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत मौजा मरूपार पुनर्वसन भिवापुर येथे दिनांक 04/12/2021 चे 09.00 वा. ते दिनांक 05/12/2021 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मायाबाई रतीराम फुलझले, वय 66 वर्ष, रा. मरूपार पुनर्वसन भिवापुर हिने आपल्या घराच्या अंगनातील खुल्या शेडमध्ये ठेवलेले सोयाबीनचे 70 कटटे पैकी 25 कटटे किं. 60,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले. तपासादरम्यान आरोपी क्र. 1) महेश अंबादास वानखेडे वय 26 वर्ष रा. किन्हीखुर्द (पु)ता.भिवापुर जि. नागपुर, 2) सुहास मनोहर वानखेडे वय 21 वर्ष, रा. किन्हीखुर्द (पु)ता.भिवापुर जि. नागपुर, 3) आशिष वासुदेव वानखेडे वय 21 वर्ष रा. सिध्दार्थ नगर, भिवापुर जि.नागपुर व 4) प्रज्वल शरद वानखेडे वय 21 वर्ष रा.दिघोरा. ता.भिवापुर जि.नागपुर यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री भस्मे मो.क्र. 9764946808 हे करीत आहे.

## फसवणुक

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 01 कि मी अंतरावरील स्टेट बॅंक एटीएम मशिन शिबा मार्केट खापरखेडा येथे दिनांक 04/12/2021 चे 17.30 वा. ते 17.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश लक्ष्मण निखाडे वय 53 वर्षे रा वार्ड क्र 1 बिनासंगम खापरखेडा हा एटीएम मशिन मधुन पैसे काढण्याकरीता गेला असता पैसे न निघाल्याने एटीएम मध्ये मागे उभा असलेला अज्ञात आरोपीने 'पैसे काढुन देतो' असे म्हणुन फिर्यादी जवळ चे एटीएम कार्ड घेवुन फिर्यादीला पिन क्र टाकायला लावुन 5,000/–रू. काढुन दिले. यानंतर आरोपीने एटीएम कार्ड अदला–बदली केले व फिर्यादीचा विश्वासघात करून दुसरा एटीएम कार्ड फिर्यादीस दिला. यानंतर आरोपीने फिर्यादीचा एटीएम कार्डचा उपयोग करून त्यांच्या अकाउंट वरून 35,000/–रू. नगद काढले व 74,500/–रू. रविशंकर नावाच्या व्यक्तीला ऑनलाईन ट्राजेंक्शन करून फिर्यादीची एकुण 1,09,500/–रू. ची विश्वासघात करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 406, 420 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंधारे पो स्टे खापरखेडा मो.नं 9823150134 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 01 कि मी अंतरावरील गुरदेव चौक मोहल्ला ता. मौदा येथे दिनांक 07/11/2021 चे 14.08 वा. ते 15.53 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अंकूर नरेंद्रसिंग गहेरवार वय 32 वर्ष रा गुरदेव चौक मोहल्ला मौदा यांचे मोबाईल वर अज्ञात आरोपीने फोन करुन 'त्यांचे नविन क्रेडीट कॉर्ड मिळाले आहे का, त्याला ॲक्टीवेट करायवे आहे' असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले की, 'मला नविन क्रेडीट कॉर्ड मिळाले आहे व नविन कॉर्ड ॲक्टीवेट करायचे असून जुना केडीट कॉर्ड डीॲक्टीवेट करायचे आहे. यावरून आरोपीने फिर्यादीचे क्रेडीट कॉडचे डिटेल मागून त्यांचे खात्यामधून 4,440/–रु व 4,440/–रू. असे एकूण 88,880/–रु. ची फसवणूक केली

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 66सी,66ड माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील सोनेगाव लोधी येथे दिनांक 04/12/2021 चे 09:30 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे– मधुकर विठोबा आत्राम वय 65 वर्ष रा सोनेगाव लोधी त. जि.नागपुर यांना टीएस–09/इपी–6306 चा कारचा चालक आरोपीने आपले ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवुन त्यांना धडक दिली. या अपघातात मधुकर विठोबा आत्राम यांचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रूपेश मधुकर आत्राम वय 40 वर्ष रा सोनेगाव लोधी त. जि.नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री वाघाडे मो.क्र. 7304210724 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावरील परधी पेटोलपंप जवळ एन.एच.53 रोड पश्चिम येथे दिनांक 04/12/2021 चे 18:10 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– सचिन मंगलु मडकाम, वय 21 वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा 2. दादू मुलाम उईके, वय 21 वर्ष रा. तकीया वार्ड भंडारा हा त्यांचे एम.एच– 36/यू– 8642 क्रमांकाच्या बजाज मोटारसायकलने डबल सिट मित्रासह नागपूर कडे भंडारा कडे येत होते. त्यादरम्यान आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याचा समोर भंडारा दिशेने जात असलेल्या अज्ञात वाहनाला मागे घेवून धडक दिली. या अपघातात आरोपी स्वःताचे मरण्यास कारणीभूत झाला व मागे बसलेला त्याचा मित्र दादू यास गंभीर जखमी होण्यास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि श्री अरविंद मोहोड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अरविंद मोहोड हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील बोरगाव शिवार येथे दिनांक 05/12/2021 चे 17.00 वा. दरम्यान अमर नंदलाल धुर्वे (मृतक), वय 30 वर्ष, रा. चटवा नवेगाव ता. जुनारदेव जि छिंदवाडा ह.मु बोरगाव धोटे पटले यांच्या विटभटयावर ता. सावनेर हा हातात इलेक्ट्रीक वायर घेवून नाल्यातील पाण्यात विदयुत करंट लावून मच्छी मारत असता त्याला उजवे हाताचे मधले बोटाला करंट लागल्याने तो बेशुध्द झाला. त्याला उपचारकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मंगलसिंग उदयलाल धुर्वे वय 50 वर्ष रा चटवा नवेगाव ता जुनारदेव जि छिंदवाडा ह.मु बोरगाव धोटे पटले यांच्या विटभटयावर ता सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार राजेंन्द्र यादव मो नं 8888821393 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर